**ठळक बातम्या**

- राज्याचे नवे राज्यपाल म्हणून सी. पी. राधाकृष्णन यांचा शपथविधी, विधानसभेचे माजी अध्यक्ष हरिभाऊ बागडे राजस्थानच्या राज्यपालपदी विराजमान
- बुलेट रेल्वे प्रकल्पाचं काम वेगानं पुढे जात असल्याची रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांची लोकसभेत ग्वाही
- वादग्रस्त परिविक्षाधीन सनदी अधिकारी पूजा खेडकर यांची नियुक्ती केंद्रीय लोकसेवा आयोगाकडून रद्द / यापुढं कोणतीही प्रशासकीय सेवा परीक्षा देण्यावरही बंदी
- गणपती उत्सवासाठी मुंबईतून कोकणात जाणाऱ्या चाकरमान्यांकरता एसटी महामंडळ यंदा ४ हजार ३०० जादा गाड्या सोडणार

**आणि**

- पॅरिस ऑलिम्पिकमध्ये भारतीय खेळाडूंची आगेकूच सुरु

**<><><><><>**

राज्याचे नवे राज्यपाल म्हणून सी. पी. राधाकृष्णन यांनी आज शपथ घेतली. मुंबईत राजभवनात आयोजित समारंभात मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश न्यायमूर्ती देवेंद्र कुमार उपाध्याय यांनी त्यांना पद आणि गोपनीयतेची शपथ दिली. यावेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस आणि अजीत पवार यांनी राज्यपाल राधाकृष्णन यांचं स्वागत केलं.

सी. पी. राधाकृष्णन याआधी झारखंडचे राज्यपाल होते. तमिळनाडूमधे भाजपा प्रदेशाध्यक्ष म्हणून त्यांनी काम केलं होतं. कोईम्बतूर लोकसभा मतदारसंघातून ते दोनदा निवडून गेले होते.

**<><><><><>**

महाराष्ट्र विधानसभेचे माजी अध्यक्ष हरिभाऊ बागडे यांनी आज राजस्थानच्या राज्यपालपदाची शपथ घेतली. मुख्य न्यायाधीश न्यायमुर्ती मणिंद्र मोहन श्रीवास्तव यांनी बागडे यांना राजभवन इथं राज्यपालपदाची शपथ दिली. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी दिलेलं नियुक्तीच्या आदेशाचं पत्र मुख्य सचिव सुधांश पंत यांनी वाचून दाखवलं. राज्यपालपदाची शपथ घेतल्यानंतर हरिभाऊ बागडे यांना मानवंदना देण्यात आली. यावेळी राजस्थानचे मुख्यमंत्री भजन लाल शर्मा, विधानसभेचे अध्यक्ष वासुदेव देवनानी, उपमुख्यमंत्री दिया कुमारी आणि प्रेमचंद बैरवा उपस्थित होते.

**<><><><><>**

बुलेट रेल्वे प्रकल्पाचं काम वेगानं पुढे जात असल्याची ग्वाही रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी आज लोकसभेत दिली. या प्रकल्पाचा एक भाग म्हणून देशात पहिल्यांदाच समुद्राच्या खाली ३० मीटरवर २१ किलोमीटरचा बोगदा बांधला जात असल्याची माहिती प्रश्नोत्तराच्या तासाला पुरवणी प्रश्नांना उत्तरादाखल वैष्णव यांनी दिली. मेट्रो प्रकल्पासाठीचं ३२० किलोमीटर पायाबांधणीचं काम पूर्ण झालं असून मेट्रो हा तंत्रज्ञानाभिमुख प्रकल्प असल्याचंही ते म्हणाले.

संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात आज लोकसभेच्या कामकाजाला सुरुवात होताच जातनिहाय जनगणना करण्याच्या मागणीवरून विरोधकांनी गदारोळ केल्यानं लोकसभेचं कामकाज १२ वाजेपर्यंत तहकूब करण्यात आलं होतं. कामकाजाला पुन्हा सुरुवात होताच प्रश्नोत्तरांचा तास पुकारण्यात आला.

**<><><><><>**

राज्य शासनाचा उद्योग विभाग आणि टोयोटा किर्लोस्कर यांच्यात छत्रपती संभाजीनगर इथं टोयोटा किर्लोस्करच्या प्रकल्पासाठी सामंजस्य करारावर स्वाक्षरी करण्यात आली. छत्रपती संभाजीनगर येथे या प्रकल्पातून इलेक्ट्रिक आणि हायब्रीड कार्सचे उत्पादन होणार आहे. टोयोटा किर्लोस्करच्या प्रकल्पामुळे भारतातल्या मोटार वाहन निर्मिती उद्योगात देखील क्रांती येईल असं मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी

म्हटलं. या प्रकल्पातून इलेक्ट्रिक आणि हायब्रीड कार्सचे उत्पादन होणार असून यासाठी २० हजार कोटींची गुंतवणूक केली जाणार आहे. या प्रकल्पातून वर्षाला ४ लाख कार्सची निर्मिती होणं अपेक्षित आहे.

<><><><><>

महाराष्ट्र हे उद्योगस्नेही राज्य असून अनेक जपानी कंपन्या राज्यात चांगलं काम करत आहेत. जपाननं भविष्यात देखील राज्यात उद्योग आणि पायाभूत सुविधा क्षेत्रात गुंतवणूक वाढवावी, असं आवाहन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केली. जपानचे नवनियुक्त कॉन्सुलेट जनरल यागी कोजी यांनी आज वर्षा निवासस्थानी मुख्यमंत्र्यांची सदिच्छा भेट घेतली त्यावेळी ते बोलत होते. भारत आणि जपान हे आशिया खंडातले महत्वाचे देश असून दोन्ही देशांचे संबंध खूप जुने असल्याचं मुख्यमंत्री शिंदे यांनी सांगितलं. जपानी कंपन्यांनी मुंबईच्या पायाभूत सुविधांच्या विकासात सहकार्य केलं असल्याचंही ते यावेळी म्हणाले. तर भारत आणि जपान यांच्यातले संबंध अधिक दृढ व्हावेत, अशी इच्छा यागी कोजी यांनी व्यक्त केली.

<><><><><>

गडचिरोली जिल्ह्यातलं देसाईगंज, अहमदनगर जिल्यातलं लिंगदेव, नाशिक जिल्ह्यातलं कळवण-सुरगणा, जांबुटके आणि अमरावती जिल्ह्यातलं वरुड इथं एमआयडीसी उभारण्यासाठी तातडीने प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिले आहेत. तसंच राज्यात यापुढे एमआयडीसी उभारण्यासाठी किमान शंभर एकर जमीनीची उपलब्धता करून देण्याचे निर्देशही त्यांनी दिले. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयातल्या त्यांच्या समिती कक्षात आज एमआयडीसी आढावा बैठक झाली, त्यावेळी ते बोलत होते.

राज्याच्या विकासात उद्योगांचं स्थान अत्यंत महत्वाचं असून उद्योगांना चालना देण्याची सरकारची भूमिका असल्याचं अजित पवार यावेळी म्हणाले. तसंच पुणे जिल्ह्यातल्या डुंबरवाडी इथं फूड प्रोसेसिंग पार्क उभारणीसाठी शासन सकारात्मक

असल्याचं त्यांनी सांगितलं. या बैठकीला मंत्री उदय सामंत, मंत्री धर्मराव आत्राम उपस्थित होते.

**<><><><><>**

भारतीय प्रशासकीय सेवेतल्या वादग्रस्त परिविक्षाधीन अधिकारी पूजा खेडकर यांची नियुक्ती केंद्रीय लोकसेवा आयोगाने रद्द केली आहे. तसंच पुन्हा कोणतीही प्रशासकीय सेवा परीक्षा देण्यावर कायमची बंदी घातली आहे. परिविक्षाधीन कालावधीत अवाजवी मागण्या केल्याचा, तसंच दिव्यांगत्वाचं खोटं प्रमाणपत्र सादर करुन आरक्षणाचा लाभ उकळल्याचा, तसंच नागरी प्रशासकीय सेवा परीक्षेच्या नियमांचं उल्लंघन केल्याचा आरोप खेडकर यांच्यावर आहे. या संदर्भात आयोगाने बजावलेल्या नोटिशीला उत्तर देण्यासाठी खेडकर यांना आज दुपारी साडेतीन पर्यंत मुदत देण्यात आली होती. मात्र त्या निर्धारित वेळेत उत्तर देऊ शकल्या नाहीत. तेव्हा केंद्रीय लोकसेवा आयोगाने हा निर्णय दिला. गेल्या १५ वर्षातल्या सुमारे १५ हजार उमेदवारांविषयीच्या नोंदी तपासून हा निर्णय दिल्याचं आयोगाने स्पष्ट केलं आहे.

दरम्यान पूजा खेडकर यांनी अटकपूर्व जामिनासाठी अर्ज केला असून दिल्लीच्या न्यायालयात त्यावर उद्या सुनावणी होणार आहे.

**<><><><><>**

केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या अध्यक्षपदी माजी केंद्रीय आरोग्य सचिव प्रीती सुदन यांची नियुक्ती करण्यात आली आहे. त्या भारतीय प्रशासकीय सेवेच्या १९८३मधल्या तुकडीतल्या अधिकारी आहेत. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी सुदन यांच्या नियुक्तीला मंजुरी दिली. उद्यापासून प्रीती सुदन पदभार स्वीकारतील. केंद्रीय लोकसेवा आयोगाचे याआधीचे अध्यक्ष डॉ. मनोज सोनी यांनी कार्यकाळ पूर्ण होण्यापूर्वीच या महिन्यात पदाचा राजीनामा दिला होता.

**<><><><><>**

गणपती उत्सवासाठी मुंबईतून कोकणात जाणाऱ्या चाकरमान्यांकरता एसटी महामंडळानं यंदा २ सप्टेंबर ते १७ सप्टेंबर दरम्यान ४ हजार ३०० जादा गाड्या सोडण्याचा निर्णय घेतला आहे. मुंबई, ठाणे, पालघर, या विभागांमधल्या प्रमुख बसस्थानकांमधून या जादा गाड्या सोडल्या जाणार आहेत. या गाड्या आरक्षणासाठी npublic.msrtcors.com या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध असून, त्यांचं आरक्षण बसस्थानकावर, किंवा महामंडळाच्या MSRTC Bus Reservation ॲपद्वारे उपलब्ध होणार आहे.

गणेशोत्सवादरम्यान एसटीची वाहतूक सुरळीत व्हावी यासाठी बसस्थानक आणि बसथांब्यावर एसटीच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या देखरेखीखाली कर्मचारी अहोरात्र कार्यरत राहणार आहेत. कोकणातल्या महामार्गावर ठिकठिकाणी वाहनदुरुस्ती पथकं तैनात केली जाणार आहेत. त्याचबरोबर प्रवाशांना नैसर्गिक विधीसाठी तात्पुरत्या स्वरूपाची प्रसाधानगृहं उभारली जाणार आहेत.

**<><><><><>**

पॅरिस ऑलिम्पिकमध्ये आज भारतीय खेळाडूंनी आगेकूच सुरु ठेवली. दोन वेळची ऑलिम्पिक पदकविजेती बॅडमिंटनपटू पी. व्ही. सिंधू हिनं पॅरिस महिला एकेरीत पुढच्या फेरीत प्रवेश केला. तिनं एस्टोनियाच्या क्रिस्टीन कूबा हिच्यावर २१-५, २१-१० अशी सहज मात केली. तर पुरुष एकेरीत लक्ष्य सेनने इंडोनेशियाचा जोनातन क्रिस्टी याचा २१-१८, २१-१२ असा पराभव केला.

पुरुषांच्या ५० मीटर रायफल थ्री पोझिशन प्रकारात स्वप्निल कुसळे यानं सातवं स्थान मिळवत पुढच्या फेरीत धडक मारली, तर ऐश्वर्य प्रताप सिंह तोमर अकराव्या स्थानावर राहिल्याने स्पर्धेतलं त्याचं आव्हान संपुष्टात आलं. मुष्टियोद्धा लोव्हलीना बोर्गोहाइन हिनं नॉर्वेच्या प्रतिस्पर्ध्यावर मात करून उपांत्यपूर्व फेरी गाठली.

टेबल टेनिसमध्ये श्रीजा अकुला हिनं झेंग जियान हिचा पराभव केला. आता तिचा पुढचा सामना अग्रमानांकित चीनच्या सुन यिंगशा हिच्याशी होणार आहे. तिरंदाजीत दीपिका कुमारी हिनंही पुढच्या फेरीतलं स्थान निश्चित केलं आहे. या स्पर्धेत भारतानं आत्तापर्यंत दोन कास्यपदकं पटकावली आहेत आणि ही दोन्ही पदकं नेमबाजीतली आहेत.